स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रवास खर्चात वाढ करण्याबाबत.......

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक पीओजेस १२८५/विक१/स्वासै,
मंत्रालय,मुंबई-४०००३२, दिनांक ११ऑगस्ट १९८५.

संदर्भ : शासन निर्णय,क्रमांक :पीओजेस १०८३/विक१/स्वासै,
दिनांक २१.९.१९८३.

शासन निर्णय :- राज्य शासनाने स्वातंत्र्य सैनिकांना अनेक सवलती दिल्या असून सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक पीओजेस १२८३/विक१/स्वासै, दिनांक २१ सप्टेंबर १९८३ अन्वये पेन्शनधारक स्वातंत्र्य सैनिकांना प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये रुपये २००/- एकरकमी अनुदान प्रवास खर्च म्हणून देण्याचा निर्णय घेतला होता. सदरहू रकमेत वाढ करावी अशी पुष्कळ स्वातंत्र्य सैनिकांनी आणि त्यांच्या संघटकांनी मागणी केली होती आणि सदरहू मागणी शासनाच्या विचाराधीन होती.

२. शासनाने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक पीओजेस १०८५/विक१/स्वासै कक्ष, दिनांक १०.५.८५ अन्वये असा निर्णय घेतला आहे की, दरवर्षी देण्यात येणा-या रुपये २००/- मध्ये वाढ करून दरवर्षी रुपये ५००/- [रु.पाचशे फक्त] प्रवासखर्च एकरकमी अनुदान म्हणून देण्यात यावे. हा निर्णय दिनांक १.४.८५ पासून अंमलात येत आहे.

३. सदर बाबीवर होणारा खर्च लेखाशीर्ष " २८८- सामाजिक सुरक्षा व कल्याण [इ] इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम,[सी], स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्ती इत्यादींना निवृत्तीवेतन [ मागणी क्रमांक १३]" या शीर्षाखाली दाखवण्यात यावा व तो जिल्हाधिका-यांच्या स्वाधीन केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. जिल्हाधिका-यांकडे सोपविण्यात आलेल्या चार माही खर्चाच्या अनुदाना व्यतिरिक्त सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे आणखी अतिरिक्त अनुदान प्रत्येक जिल्हाधिका-यांकडे सुपूर्द करण्यात येत आहे. प्रवास खर्चाच्या अनुदानाची बीले ताबडतोब तयार करून सर्व पेन्शनधारक स्वातंत्र्य सैनिकांना प्रवास खर्चाची वाढीव दराने रक्कम देण्यात यावी. त्याबाबत किती खर्च झाला ते शासनास तात्काळ कळवावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सहाय्यक सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
अध्यक्ष व इतर सदस्य स्वातंत्र्यसैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य २, नागपूर,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निवासी लेखा-परीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग, ईएक्सपी-७, वित्त विभाग-जीईएन-५ [ ५ प्रतीसह ],
सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन क्रमांक २५,
माहिती व जनसंपर्क संचालनालय, [ प्रसिध्दी पत्रक काढण्यासाठी ]
निवड फाईल.

विवरण पत्र

[सन १९८५-८६ साठी "२८८- सामाजिक सुरक्षा व कल्याण [सी] स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती इत्यादींना निवृत्ती वेतन मागणी क्रमांक १३" या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली जिल्हाधिकाऱ्यांकडे स्वाधीन करण्यात येत असलेले अतिरिक्त अनुदान खालीलप्रमाणे आहे.]

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | मुंबई | ४,००,००० |
| २. | ठाणे | २,५०,००० |
| ३. | रायगड | १,१०,००० |
| ४. | रत्नागिरी | १,००,००० |
| ५. | सिंधुदुर्ग | १,००,००० |
| ६. | पुणे | ३,६०,००० |
| ७. | सातारा | ४,५०,००० |
| ८. | सांगली | ५,५०,००० |
| ९. | सोलापूर | १,७५,००० |
| १०. | कोल्हापूर | २,७५,००० |
| ११. | औरंगाबाद | २,००,००० |
| १२. | जालना | १,००,००० |
| १३. | नांदेड | २,००,००० |
| १४. | परभणी | ४,००,००० |
| १५. | बीड | २,००,००० |
| १६. | उस्मानाबाद | २,२५,००० |
| १७. | लातूर | २,२५,००० |
| १८. | अहमदनगर | २,००,००० |
| १९. | नाशिक | १,५०,००० |
| २०. | धुळे | १,२५,००० |
| २१. | जळगांव | ३,००,००० |
| २२. | बुलढाणा | ५०,००० |

कृ.मा.प....

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| २३. | अकोला. | १,७५,००० |
| २४. | अमरावती | २,२५,००० |
| २५. | यवतमाळ | १,००,००० |
| २६. | वर्धा | १,००,००० |
| २७. | नागपूर | २,००,००० |
| २८. | चंद्रपूर | ७५,००० |
| २९. | गडचिरोली | २५,००० |
| ३०. | भंडारा | १,५०,००० |
| | एकूण रुपये | ६१,९५,००० |